**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर**

सचिव कार्यालय
दिनांक:- २५/७/२००८

**प्रति,**

मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **क्र.८ मंगळवार दिनांक २९/७/२००८रोजी दुपारी १.००** वाजता स्थायी समिती कार्यालयात खालील विषयावर विचार - विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण सर्वांनी उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ८**

**सन-२००८-२००९**

**मंगळवार दिनांक. २९/७/२००८ ची विषय पत्रिका.**

**विषय क्रं.** **विषय**

१. मा.स्थायी समिती समिती सभा क्रमांक ६ मंगळवार दिनांक १/७/२००८ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ७ शनिवार दिनांक ५/७/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

२. अहमदनगर महानगरपालिकेचे आदर्श शाळा क्रमांक २६ मधील माणिक चौक येथील वर्ग खोलीचे भाडे रद्द करून नाममात्र शुल्क आकारणी करणे बाबत अर्जदार श्री. उबेद शेख, चेअरमन डॉ. हाजी शेख अहमद मेमोरिअल फौन्डेशन यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

३. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ केडगांव दूधसागर सोसायटी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मा. महापौर शहर विकास निधीतून करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १२,६७,१०८/- चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

४. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये श्री. शेख अदिल अहमद इसाक यांची ऑटो मोबाईल इंजिनिअर पदी , श्री. गायकवाड अभिजित लालेश व श्री. लखापती अजय अरूणराव यांची कनिष्ठ अभियंता या पदी सहामहिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने दरमहा मानधन रूपये सहा हजार फक्त चे मानधनावर नेमणूक करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

५. अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ केडगांव शाहुनगर येथील सर्व्हे नं. ५००/२ या ओपन स्पेस मध्ये उदयान विकसीत करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १४,७०,७२०/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

६. अहमदनगर महानगरपालिकेचा सन १९५४ साली प्रसिध्द करण्यांत आलेल्या शतसंवत्सरी स्मारक ग्रंथामध्ये सन-१९५४ ते म.न.पा.चे स्थापने पर्यंतच्या विविध नोंदी समाविष्ट करून पुर्नप्रकाशन करणेसाठी अभ्यासकांची व मा. सदस्यांची विशेष समिती गठीत करून सदर ग्रंथ नागरिकांना परवडणा-या किंमती मध्ये उपलभ्द करून देणेस व तद्नुषंगिक खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

७. अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००८-२००९ सालचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतूदी नुसार तयार केलेले रूपये ३,२९,९०,०००/- फक्तचे पुर्नविनियोजीत अंदाज पत्रक मंजूरीस्तव.

८. अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल २००७ ते मार्च २००८ अखेर चे महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक ५९(१) नमुना क्रमांक २७ प्रमाणे तयार केलेले बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे, नियम क्रमांक ६० नमुना क्रमांक २८ प्रमाणे मत्ता दायित्व व लेख्यांचा सारांश मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६( ३ ) अन्वये मंजूरीस्तव.

९. नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये म्यु.पल घर नं. ४०२७ या घराचे धोकादायक भागा बाबत केलेल्या कारवाई च्या अनुषंगाने भाडेकरी श्री. सु.ना. पारगांवकर यांचे ताब्यातील घरातील जप्त केलेल्या सामानाचे नुकसान भरपाई बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

१०. मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ५ दिनांक १८/०९/२००६ अन्वये चे मंजूरी नुसार "प्रभाग क्रमांक १० संजय नगर झोपडपट्टी भागासाठी ८० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन म.न.पा. अग्निशमन दल कार्यालय् ते संजयनगर दरम्यान टाकणे" ऐवजी सदर पाईप लाईन "आगरकर मळा येथील पाण्याचे उंच टाकी पासून संजयनगर दरम्यान टाकणे" असा बदल करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत** :- मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ६ मंगळवार दिनांक १/७/२००८ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ७ शनिवार दिनांक ५/७/२००८ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत व विषय क्रमांक ३ ते १० च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**
सन २००८-२००९

विषय क्रमांक- १ मंगळवार दिनांक २९/७/२००८
ठराव क्रमांक -१ मंगळवार दिनांक २९/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ६ मंगळवार दिनांक १/७/२००८ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ७ शनिवार दि.५/७/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मा. स्थायी समिती सभा क्रमांक ६ मंगळवार दिनांक १/७/२००८ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ७ शनिवार दि.५/७/२००८रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक १/७/२००८ व दिनांक ५/७/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे. मा.सदस्यांनी त्याबाबत आपल्या सुचना दुरूस्त्या सांगाव्यात.

मा.श्री. शिंदे द.बा.:- मागिल सभांचे कार्यवृत्त मंजूर करावे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- मागिल दोनही सभांचे कार्यवृत्त मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :-मागिल सभा दिनांक १/७/२००८ व दिनांक ५/७/२००८ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यांत यावे.

**ठराव :-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक ६ मंगळवार दिनांक १/७/२००८ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ७ शनिवार दि.५/७/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-२ मंगळवार दिनांक २९/७/२००८

ठराव क्रमांक :-२ मंगळवार दिनांक २९/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आदर्श शाळा क्रमांक-२६ माणिक चौक येथील वर्ग खोलीचे भाडे रद्द करून नाममात्र शुल्क आकारणी करणे बाबत अर्जदार श्री. उबेद शेख, चेअरमन, डॉ.हाजी शेख अहमद मेमोरिअल फौन्डेशन यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :- विषय**- डॉ.हाजी शेख अहमद मेमोरिअल फौन्डेशच्या आदर्श शाळा वर्ग खोलीचे भाडे रद्द करून नाममात्र शुल्क आकारणी करणे बाबत.

**संदर्भ** :-श्री. उबेद शेख चेअरमन डॉ. हाजी शेख अहमद मेमोरिअल फौन्डेशन अहमद मेमोरिअल फौन्डेशन अहमदनगर यांचेकडील पत्र.

महोदय,

महानगरपालिका शाळा क्रमांक-२६ माणिक चौक अहमदनगर येथील एक वर्ग खोली आपलेकडील ठरावा अन्वये अर्जदारांस वापरण्यास देण्यांत आलेली आहे. सदर वर्ग खोलीस सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे आकारून आलेले आहे. तथापी सदर अर्जदारांनी नाममात्र भाडे आकारून मिळणे बाबत अर्ज केलेला आहे. सदर अर्जावरून मा.आयुक्त साहेब यांचेकडे टिपणी सादर केली असता क्रमांक-१९२ दिनांक ९/५/२००८ अन्वये आपणांकडे मजूरीसाठी पाठविणेबाबत आदेश झालेले आहे.

तरी टिपणी व अर्जदारांकडील पत्र व भाडे आकारणी तक्ता ( मनपा वसुली विभाग) मा.स्थायी समिती ठराव सोबत सविनय सादर करीत आहे.

आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रशासनाधिकारी, शिक्षण मंडळ,मनपा यांचा अहवाल असे दि. १९/५/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र.:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. तिवारी सु.र.:- मा.आयुक्त साहेबांनी सदर प्रकरणी काय अभिप्राय दिला आहे. शिक्षण मंडळाला सदर जागेचे भाडे ठरविणेचा अधिकार आहे का ?

मा.उपायुक्त डॉ.श्री. जावळे साहेब :- भाडे आकारणी बाबतचे अधिकार मा.स्थायी समितीस असलेने मा.स्थायी समितीकडेस सदर प्रकरणी निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. म.न.पा शाळांचे वर्ग खोल्यांचे भाडे ठरविणे अगर कमी करणेचा अधिकार शिक्षण मंडळास नाही.

मा.श्री.कोतकर भा.ए.:-भाडे कमी करणे किंवा कसे या बाबत प्रशासनाने स्पष्ट अभिप्राय देणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- सदर प्रकरणी भाडे कमी करणे योग्य की अयोग्य याबाबत प्रशासनाने स्पष्ट अभिप्राय दिलेला नाही.

मा.श्री. शिंदे द.बा.:- प्रशासनाचा स्पष्ट अभिप्राय मागवावा.

मा.सौ. खरपुडे ज.सु.:- स्पष्ट अभिप्रायासह पुढील सभेत प्रस्ताव निर्णयासाठी घेणेत यावा.

मा.सभापती साहेब :- सदर वर्ग खोलीचे भाडे कमी करणे योग्य की अयोग्य या बाबत प्रशासनाने स्पष्ट अभिप्राय द्यावा. प्रशासनाचे अभिप्रायासह प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करणेत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे आदर्श शाळा क्रमांक-२६ माणिक चौक येथील वर्ग खोलीचे भाडे रद्द करून नाममात्र शुल्क आकारणी करणे बाबत अर्जदार श्री. उबेद शेख, चेअरमन, डॉ.हाजी शेख अहमद मेमोरिअल फौन्डेशन यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्टावर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेणेत येत आहे.

सदर वर्ग खोलीचे अर्जदार यांचे अर्जा प्रमाणे भाडे रद्द करून नाममात्र शुल्क आकारणी करणे योग्य की अयोग्य या बाबत प्रशासनाने स्पष्ट अभिप्राय दिलेला नाही. प्रशासनाचे स्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस फेर सादर करणेत यावा.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-३ मंगळवार दिनांक २९/७/२००८

ठराव क्रमांक :-३ मंगळवार दिनांक २९/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ केडगांव दूधसागर सोसायटी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मा. महापौर शहर विकास निधीतून करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १२,६७,१०८/- चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. ७ मध्ये केडगाव दुधसागर सोसायटी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे.

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, प्रभाग क्र. ७ मध्ये केडगांव दुधसागर सोसायटी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम मा. महापौर साहेब यांनी इकडेस यादी देउन सदर काम मा. महापौर शहर विकास निधीतुन करणेचे सुचित केलेले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी रस्त्याचे खडीकरण झालेले असून रस्ता डांबरीकरण करणेचे कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००७-०८ च्या सार्व.बांध.विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १२,६७,१०८/- इतकी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्र.७ केडगांव येथील दूधसागर सोसायटी मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मा.महापौर शहर विकास निधीतून करणेस व खर्चास मंजूरी देणे बाबतचा प्रस्ताव आहे.

मा.श्री.शेख आरिफ शे.र.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. पवार सं.बा. :- प्रस्ताव मंजूर करावा काम तातडीने करणेत यावे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ केडगांव दूधसागर सोसायटी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मा. महापौर शहर विकास निधीतून करणेस व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १२,६७,१०८/-(रूपये बारा लाख सदुसष्ट हजार एकशे आठ फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-४ मंगळवार दिनांक २९/७/२००८
ठराव क्रमांक :-४ मंगळवार दिनांक २९/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये श्री. शेख अदिल अहमद इसाक यांची ऑटो मोबाईल इंजिनिअर पदी ,श्री. गायकवाड अभिजित लालेश व श्री. लखापती अजय अरूणराव यांची कनिष्ठ अभियंता या पदी सहामहिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने दरमहा मानधन रूपये सहा हजार फक्त चे मानधनावर नेमणूक करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता यांची मानधनावर नेमणूक करणेबाबत.

शहर अभियंता व मॅकेनिकल इंजिनियर यांच्या प्रस्तावाप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेमध्ये कनिष्ठ अभियंत्याची संख्या अपुरी असल्यामुळे तात्पुत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंते भरणे बाबत सुचित केले होते. यापुर्वी शेख अदिल अहमद इसाक यांची ॲटो मोबाईल इंजिनियर या पदी व श्री. गायकवाड अभिजित लालेश व लखापती अजय अरूणराव यांना कनिष्ठ अभियंता या पदावर रू. ६,०००/- मानधनावर नेमणूक करणेत आलेल्या होत्या सदरच्या नेमणुका दि. २-७-२००८ रोजी समाप्त झ ाालेल्या आहेत.

तरी उपरोक्त प्रस्तावाप्रमाणे श्री. शेख अदिल अहमद इसाक यांची ऑटो मोबाईल इंजिनियर पदी व श्री. गायकवाड व श्री. लखापती यांची कनिष्ठ अभियंता या पदावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरिता दरमहा रू. ६,०००/- इतक्या मानधनावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३(३)अन्वये सदर विषयाबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे मंजुरीसाठी निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे श्री. व्ही.एस.थोरात ,आस्थापना अधिक्षक यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये श्री. शेख अदिल अहमद इसाक यांची ऑटो मोबाईल इंजिनिअर पदी ,श्री. गायकवाड अभिजित लालेश व श्री. लखापती अजय अरूणराव यांची कनिष्ठ अभियंता या पदी सहामहिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने दरमहा मानधन रूपये सहा हजार फक्त चे मानधनावर नेमणूक करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सदर अभियंत्यांना मानधनावर घेणे आवश्यक आहे का?

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी.:- म.न.पा.चे कामाचे खरूप वाढलेले असल्याने सदर अभियंत्याची आवश्यकता आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- आवश्यकता असलेने मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सदर अभियंत्याना बारा महिन्यासाठी नेमणेत यावे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- सहामहिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी नेमणूका नियमानुसार देता येणार नाहीत.

मा.सहाय्यकआयुक्त श्री देशमुख साहेब :- म.न.पाचे आस्थापना सुचीवर अभियंत्याचे आवश्यक पदे निर्मिती साठी प्रस्ताव मा.शासनाकडेस सादर करणे आवश्यक आहे.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये श्री. शेख अदिल अहमद इसाक यांची ऑटो मोबाईल इंजिनिअर पदी ,श्री. गायकवाड अभिजित लालेश व श्री. लखापती अजय अरूणराव यांची कनिष्ठ अभियंता या पदी सहामहिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने प्रत्येंकी दरमहा मानधन रूपये ६,०००/- (रूपये सहा हजार फक्त) चे मानधनावर नेमणूका करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.मात्र म.न.पाचे आस्थापना सुचीवर अभियंत्याचे आवश्यक पदे निर्मिती साठी प्रस्ताव मा.शासनाकडेस सादर करणे विषयी पुढील कार्यवाही करणेत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-५ मंगळवार दिनांक २९/७/२००८

ठराव क्रमांक :-५ मंगळवार दिनांक २९/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ केडगांव शाहुनगर येथील सर्व्हे नं. ५००/२ या ओपन स्पेस मध्ये उद्यान विकसीत करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १४,७०,७२०/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. ७ केडगाव शाहूनगर येथे स.नं. ५००/२ या ओपन स्पेसमध्ये उदयान विकसीत करणे.

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, प्रभाग क्र. ७ केडगांव शाहूनगर येथे स.नं. ५००/२ या ओपन स्पेसमध्ये उद्यान विकसीत करणेचे काम मा. महापौर साहेब यांनी इकडेस यादी देउन सदर काम नवीन उदयान या महानगरपालिकेच्या लेखाशिर्षातून करणेचे सुचित केलेले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत सदरच्या खुल्या जागेस महानगरपालिके मार्फत संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. त्या ओपन स्पेसमध्ये जमीनीचे सपाटीकरण करून उदयान विकसीत करण्याचे अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या आर्किटेक्ट पॅनल बोर्डवर नेमणूक करण्यात आलेल्या मे. अविष्कार आर्किटेक्टस् ॲण्ड इंजिनिअरींग ग्रुप यांचे कडून सदरचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १४,७०,७२०/- इतकी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक सात शाहुनगर केडगांव येथील सर्व्हे क्रमांक ५००/२ या ओपन स्पेस मध्ये उद्यान विकसीत करणेस व खर्चास मंजूरी देणे बाबतचा प्रस्ताव आहे.

मा.सौ. पवार सं.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्टानुसार बगीचा विकसीत करणेस मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ केडगांव शाहुनगर येथील सर्व्हे नं. ५००/२ या ओपन स्पेस मध्ये उद्यान विकसीत करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १४,७०,७२०/-(रूपये चौदा लाख सत्तर हजार सातशे वीस फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा. सौ. पवार संध्या बाळासाहेब.

अनुमोदक :- मा.श्री.शिंदे दशरथ बाबु.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-६ मंगळवार दिनांक २९/७/२००८
ठराव क्रमांक :-६ मंगळवार दिनांक २९/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचा सन १९५४ साली प्रसिध्द करण्यांत आलेल्या शतसंवत्सरी स्मारक ग्रंथामध्ये सन-१९५४ ते म.न.पा.चे स्थापने पर्यंतच्या विविध नोंदी समाविष्ट करून पुर्नप्रकाशन करणेसाठी अभ्यासकांची व मा. सदस्यांची विशेष समिती गठीत करून सदर ग्रंथ नागरिकांना परवडणा-या किंमती मध्ये उपलभ्द करून देणेस व तद्‌नुषंगिक खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-महानगरपालिका शतसंवत्सरी स्मारक ग्रंथ संपादीत करणे बाबत.
संदर्भ :-मा.सदस्य श्री.अशोक कानडे,श्री. बहिरनाथ वाकळे, श्री.दशरथ शिंदे व महिला बालकल्याण समिती सभापती सौ.योगिता सत्रे, मा.श्री. बारस्कार पो.ज. यांचे दि. ०५/०६/२००८ चे पत्र.

सादर,

कारणे विनंती रिपोर्ट करण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेचा सन १८५४ ते १९५४ या १०० वर्षाची माहिती देणारा "शतसंवत्सरी" हा स्मारक ग्रंथ सन १९५४ साली प्रसिध्द करण्यांत आला सदर ग्रथांच्या प्रती महानगरपालिकेमध्ये शिल्लक नसुन हा ग्रंथ संपादीत करणे संदर्भात व यासाठी येणा-या खर्चास मंजूरी मिळणे बाबत संदर्भीय पत्र दिले आहे.

सदर ग्रंथ दुर्मिळ असुन सुमारे ५५० पानांचा आहे. ( फोटो व सुचीसह) हा ग्रंथ पुर्नप्रकाशित करणे गरजेचे असुन या ग्रंथामध्ये १९५४ ते महानगरपालिकेच्या स्थापने पर्यंतच्या विविध नोंदी असणारी प्रस्तावना किंवा सूची तयार करून ग्रंथाचे पुर्नप्रकाशन करता येईल. तसेच या ग्रंथामध्ये अंदाजे १०० ते १५० पानांची जास्त भर पडू शकेल. सदर संपादन करण्यासाठी अभ्यासकांची व मा. सदस्यांची विशेष समिती नेमल्यास योग्य होईल असे वाटते.

उपरोक्त विषय मा.स्थायी समितीचे अखत्यारितील असलेमुळे या विषयास स्थायी समितीची मंजूरी असणे आवश्यक आहे. ग्रंथाचे पुर्नप्रकाशन करणे, समिती गठीत करणे यासाठी येणा-या खर्चास मंजूरी देणे तसेच प्रकाशन सोहळयाचे आयोजन करणे. व हा ग्रंथ नागरिकांना परवडणा-या किमतीत उपलब्ध करून देणेसाठी सदरचा विषय मा.स्थायी समिती पुढे मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे प्रसिध्दी अधिकारी यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचा सन १९५४ साली प्रसिध्द करण्यांत आलेल्या शतसंवत्सरी स्मारक ग्रंथामध्ये सन-१९५४ ते म.न.पा.चे स्थापने पर्यंतच्या विविध नोंदी समाविष्ट करून पुर्नप्रकाशन करणेसाठी अभ्यासकांची व मा. सदस्यांची विशेष समिती गठीत करून सदर ग्रंथ नागरिकांना परवडणा-या किंमती मध्ये उपलब्ध करून देणेस व तद्नुषंगिक खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मा.सहा.आयुक्त श्री. देशमुख साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचा " शतसंवत्सरीक " ग्रंथ सन १९५४ साली प्रसिध्द करणेत आला असून त्याच्या प्रती म.न.पा मध्ये शिल्लक नाहीत १९५४ ते म.न.पा. स्थापने पर्यत ची माहिती सदर ग्रंथामध्ये समाविष्ट करून पुर्नप्रकाशन करणे साठी समिती गठीत करणे, ग्रंथ परवडणा-या किंमती मध्ये नागरिकांना उपलब्ध करून देणे तसेच सदर कामी येणारे खर्चास मंजूरी देणे बाबत प्रस्ताव आहे. सविस्तर माहिती प्रसिध्दी अधिकारी देउ शकतील.

मा.सभापती साहेब :- प्रसिध्दी अधिकारी यांना सभेत बोलवावे.

त्याप्रमाणे प्रसिध्दी अधिकारी सौ. निलीमा बंडेलू सभेमध्ये हजर झाल्या.

मा.सभापती साहेब:-महानगरपालिकेचा"शतसंवत्सरीक"ग्रंथाचे पुर्नप्रकाशन करणे विषयी प्रस्तावाची माहिती सांगावी.

प्रसिध्दी अधिकारी सौ.बंडेलू मॅडम:-सन १८५४ ते १९५४ या शंभर वर्षाची माहिती देणारा "शतसंवत्सरीक" हा स्मारक ग्रंथ सन १९५४ साली प्रसिध्द करण्यात आला होता. हा ऐतिहासीक माहिती असलेला संदर्भ ग्रंथ असुन तो दुर्मिळ झालेला आहे. आपले म.न.पा कडेस असा एकच ग्रंथ शिल्लक आहे. आपले अहमदनगर शहरा मधील इतिहासतज्ञाची, अभ्यासकांची मदत घेउन सन-१९५४ ते मनपा स्थापने पर्यत च्या महत्वाच्या घटनांच्या नोंदीचा समावेश त्यामध्ये करून सदर ग्रंथाचे पुर्नप्रकाशन करणे बाबत मा.सदस्य श्री. अशोक कानडे, श्री. बहिरनाथ वाकळे,श्री. दशरथ शिंदे व महिला बाल कल्याण समितीच्या सभापती मा.सौ. योगिता सत्रे,मा.श्री बारस्कार पो.ज. यांनी पत्र दिलेले आहे. सदर ग्रंथ प्रकाशीत करणे साठी आपले नगर मधील इतिहास प्रेमी तज्ञ श्री. सुरेश जोशी ,श्री गोपाळराव मिरीकर या जेष्ठ नागरिकांचे सहकार्याने सदर ग्रंथामध्ये विविध नोंदीची भर टाकून ग्रंथ प्रकाशित करणे करिता एक समिती गठीत करणे आवश्यक आहे.या समितीमध्ये घ्यावयाच्या इतिहासप्रेमी तज्ञाची व मा.सदस्यांची नांवे सुचवावीत तसेच सदर ग्रंथामध्ये किती माहिती समाविष्ट होईल याचा ही अंदाज नसलेने अंदाजे खर्चास मंजूरी मिळणे करिता प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.सभापती साहेब :- सदरचे स्मारक ग्रंथ प्रकाशनासाठी मा.उपायुक्त श्री.पंकज जावळे साहेब यांचे अध्यक्षतेखाली विशेष समिती गठीत करणेत यावी या समितीवर इतिहासतज्ञ श्री. सुरेश जोशी,पत्रकार, श्री. श्रीपाद मिरीकर, श्री. विशाल अंबादास वाकळे यांना घेण्यांत यावे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- इतिहास अभ्यासक श्री. असिफखान दुलेखान यांचेसह मा.नगरसेवक श्री. अशोक कानडे ,श्री.बहिरनाथ वाकळे यांना ही सदर समितीवर घेण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- मा.नगरसेवक श्री. सुनिल त्रिपाठी यांनाही समितीवर घेणेत यावे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- श्री. जयंत येलूलकर यांनाही समितीवर घ्यावे.

मा.सहा.आयुक्त श्री.देशमुख साहेब :- जिल्हा माहिती अधिकारी, नगर कॉलेज चे प्राध्यापक श्री. बाळ कांबळे तसेच प्राध्यापक डॉ.श्री. भि.ना.दहातोंडे यांना ही समिती वर घेणेत यावे.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.समिती गठीत करणेस व खर्चास मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- सदर ग्रंथाचे प्रकाशन करणेस व तो नाममात्र किंमती मध्ये नागरिकांना उपलब्ध करून देण्यांस मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :-ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यात यावी.सदरचे महानगरपालिकेचे "शतसंवत्सरीक" ग्रंथामध्ये जुन्या माहितीसह नवीन माहितीचा समावेश करून नवीन ग्रंथ प्रकाशित करणेसाठी मा.उपायुक्त डॉ.श्री. पंकज जावळे साहेब यांचे अध्यक्षतेखाली श्री. सुरेश जोशी, श्री. श्रीपाद मिरीकर, इतिहास अभ्यासक श्री. असिफखान दुलेखान, श्री. विशाल अंबादास वाकळे,श्री. जयंत येलूलकर,डॉ.श्री. भि.ना. दहातोंडे, प्राध्यापक श्री.बाळ कांबळे यांचे सह मा.सदस्य श्री. अशोक कानडे, श्री.बहिरनाथ वाकळे, श्री. सुनिल त्रिपाठी व म.न.पाचे प्रसिध्दी अधिकारी सौ. निलीमा बंडेलू मॅडम यांची कमेटी गठीत करणेस मंजूरी देण्यांत यावी. ऑफिस रिपोर्टास,आवश्यक खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचा सन १९५४ साली प्रसिध्द करण्यांत आलेल्या "शतसंवत्सरीक स्मारक" ग्रंथामध्ये सन-१९५४ ते म.न.पा.चे स्थापने पर्यंतच्या विविध नोंदी समाविष्ट करून ग्रंथाचे पुर्नप्रकाशन करणेसाठी मा.उपायुक्त डॉ.श्री. पंकज जावळे साहेब यांचे अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे इतिहास अभ्यासकांची, इतिहासप्रेमींची विशेष समिती गठीत करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| डॉ.श्री पंकज जावळे. | अध्यक्ष | उपायुक्त, म.न.पा. अ.नगर |
| श्री. सुरेश जोशी. | सदस्य | अहमदनगर वस्तु संग्रहालय विश्वस्त |
| श्री. श्रीपाद मिरीकर. | सदस्य | पत्रकार |
| श्री. असिफखान दुलेखान | सदस्य | इतिहास अभ्यासक |
| श्री. विशाल अंबादास वाकळे | सदस्य | इतिहास अभ्यासक |
| श्री. बाळ कांबळे | सदस्य | प्राध्यापक नगर कॉलेज |
| श्री. जयंत येलूलकर. | सदस्य | माजी सभापती, क्रीडा समिती. |
| डॉ.श्री. भि.ना. दहातोंडे. | सदस्य | प्राध्यापक, |
| श्री. अशोक कानडे | सदस्य | मा. नगरसेवक,म.न.पा.अ.नगर |
| श्री. बहिरनाथ वाकळे. | सदस्य | मा. नगरसेवक, म.न.पा.अ.नगर |
| श्री. सुनिल त्रिपाठी. | सदस्य | मा.नगरसेवक, म.न.पा. अ.नगर |
| सौ. निलीमा बंडेलू. | सदस्या | प्रसिध्दी अधिकारी म.न.पा.अ.नगर |

तसेच सदर ग्रंथ संपादन करून पुर्नप्रकाशन करणे कामी व सदर ग्रंथ नागरिकांना परवडणा-या किंमती मध्ये उपलब्ध करून देणे कामी येणा-या आवश्यक खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु. सही/-

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही/-

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-७ मंगळवार दिनांक २९/७/२००८

ठराव क्रमांक :-७ मंगळवार दिनांक २९/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००८-२००९ सालचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतूदी नुसार तयार केलेले रूपये ३,२९,९०,०००/- फक्तचे पुनर्विनियोजीत अंदाज पत्रक मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** कार्यालयीन टिपणी-विषय-सन ०८-०९ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन करणेबाबत

सादर,

उपरोक्त विषयान्वये सादर करणेत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २००८-२००९ चे मंजूर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदानात वाढ / घट करणेबाबत विविध विभागांकडून प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. अर्थ विभागाकडे विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करून व संबंधीत विभाग प्रमुखांची अर्थ विभागाने बैठक घेउन पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाबाबत चर्चा केली. चर्चेअंती सन २००८-२००९ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०३ व अनुसुची "ड" मधील प्रकरण ७ मधील २(२) (अ) (ब) (क) अन्वये रकमा करणे किंवा बदली करणे नुसार प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त नियमानुसार स्थायी समितीस सरकारी वर्षात कोणत्याही वेळी-

(अ) अर्थ संकल्पीय अनुदानाची रक्कम कमी करता येईल.

(ब) अर्थ संकल्पीय अनुदानातील कोणतीही रक्कम एका गौण शीर्षातून दुस-या गौण शीर्षात किंवा एका गौण शीर्षाखालील दुय्यम शीर्षातून दुस-या गौण शीर्षाखालील दुय्यम शीर्षात बदली करण्यास मंजूरी देता येईल.

(क) गौण शीर्षाखालील पाच हजार रूपयांपेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम, एका दुय्यम शीर्षातून दुस-या दुय्यम शीर्षात किंवा एका प्राथमिक घटकातून दुस-या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजुरी देता येईल, अशी तरतूद आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे" या तरतुदीनुसार " कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षातर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत." अशी तरतूद असल्याने प्रकरण ७ मधील २ (२) मधील (अ) (ब) व (क) नुसार सन २००८-२००९ चे पुनर्विनियोजीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.त्यामुळे अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदान एका लेखाशिर्षातून घट करून दुस-या लेखाशिर्षात वाढ केल्याने एकुण मुळ अंदाजपत्रकात कोणतीही वाढ किंवा घट होत नाही. मुळ अंदाजपत्रकातील जमेची बाजू सुरवातीचे शिलेकसह रूपये १,७१,९२,०५,०००/- इतकी असुन वर्ष अखेरीस होणारा अंदाजे खर्च रूपये १,७१,८७,०५,०००/- वजा जाता अखेरची शिल्लक अंदाजे रूपये ५,००,०००/- राहील.

तरी सोबत जोडलेले सन २००८-२००९ चे रू. ३,२९,९०,०००/- ( अक्षरी रूपये तीन कोटी एकोणतीस लाख नव्वद हजार फक्त) चे पुनर्विनियोजीत अंदाजपत्रक मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समोर ठेवणे योग्य राहील. कृपया आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चा नमुना क्रमांक १० नियम ३० (३) पहा

अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर.

सन- २००८-२००९ चे सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र.

| | | | | या शिर्षातून | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्रमांक | प्रधान, गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | दि. १६ जुलै २००८ अखेरचा खर्च | उपलब्ध शिल्लक (प्रस्तावीत कमी करावयाची रक्कम) | (४-६) सुधारीत तरतुद | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | -६ | ७ | ८ |
| १ | नगररचना विभाग | आर्किटेक्ट कन्सलटंट फी | १५००००० | ४५०० | ७००००० | ८००००० | खर्च कमी झाल्याने तरतुद कमी केली |
| २ | मोटार व्हेईकल विभाग | नवीन वाहने खरेदी | २५००००० | ० | १०००००० | १५००००० | १६ जुलैपर्यत खर्च न झाल्याने तरतुद कमी केली |
| ३ | आरोग्य विभाग | खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक | २०००००००० | ८१९९५० | १०००००००० | १०००००००० | चार महिन्यात कचरा संकलनाचे खाजगीकरण न झाल्याने जास्त तरतुदीची आवश्यकता नसल्याने |
| | | हायप्रेशर युनिट खरेदी | ३००००० | | २९०००० | १०००० | खर्च होणार नसल्याने तरतुद कमी केली. |
| ४ | क्रीडा व सांस्कृतिक विभाग | मिशन ऑलम्पिक चॅम्पियनसाठी खेळाडूंना मदत | १०००००० | ० | ५००००० | ५००००० | पात्र खेळाडू न मिळाल्यामुळे तरतुद कमी केली. |
| ५ | सार्वजनिक बांधकाम विभाग | यु.आय.डी.एस.एस. एम.टी म.न.पा. हिस्सा | ५०००००००० | ५६१५९६० | २०००००००० | ३०००००००० | मनपा हिस्सा वर्ग करूनही खर्च होणार नसल्याने तरतुद कमी केली. |
| | | पिंपळगाव तलाव विकसित करणे | १०००००० | ० | ५००००० | ५००००० | बिओटीवर करावयाचे असल्याचे टोकण तरतुद ठेवली. |
| | | **एकुण रक्कम ( तरतुद)** | | | **३२९९००००** | | |

सही/-
मुख्य लेखाधिकारी
अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

| हया शिर्षात | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | प्रधान, गौण व तपशील वार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | दि. १६ जुलै २००८ अखेरचा खर्च | प्रस्तावीत वाढीची रक्कम | अभिप्राय (११+१३) सुधारीत तरतुद | अभिप्राय |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५- | १६ |
| १ | सामान्य प्रशासन विभाग | प्रवासभत्ता देयके | १५०००० | १५५०६३ | १००००० | २५०००० | विमानाने प्रवास केल्याने खर्चात वाढ |
| २ | आस्थापना विभाग | पेन्शन व रजावेतन अंशदान | ६००००० | ८५१९८५ | ३७०००० | ९७०००० | मागील अंशदानाची रक्कम भरणा केल्याने वाढ करणे आवश्यक |
| ३ | विद्युत विभाग | नवीन इले. पोल, स्ट्रीट लाईट, स्पॅन फिटींग | ९०००००० | ८९२३८०३ | ५०००००० | १४०००००० | मागील वर्षाचे देयके अदा केल्याने तरतुद संपली त्यामुळे वाढ केली. |
| | | १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे | ६०००००० | २३११२९९ | ४२००००० | १०२००००० | मागील वर्षाची व चालू वर्षाची देयके अदा करावयाची असल्याने वाढ केली. |
| ४ | उद्यान विभाग | गुच्छ,हार,फुले खरेदी | ४५००० | ४५५६० | २०००० | ६५००० | तरतुद संपल्याने वाढ करणे आवश्यक |
| ५ | सार्व.बांधकाम विभाग | रस्ते कॉंक्रीटीकरण | ५०००००० | ३७३९७७१ | २०००००० | ७०००००० | मागील वर्षाची देयके अदा केल्याने तरतुदीत वाढ करणे गरजेचे. |
| | | इमारत दुरूस्ती | ३०००००० | ३०९२२१९ | २०००००० | ५०००००० | तरतुद संपल्याने वाढ करणे आवश्यक. |
| | | नवीन इमारत | ४७००००० | १२९५९९५ | १३००००० | ६०००००० | मनपा इमारतीचे नुतनीकरण व नवीन इमारत बांधकाम करणे. त्यामुळे तरतुदीत वाढ |
| | | नवीन प्रशासकीय इमारत | ७५००००० | ० | ६०००००० | १३५००००० | उर्वरित बांधकाम व इंटेरिअर डेकोरेशनचे काम करणे आवश्यक असल्याने तरतूद वाढविणे आवश्यक |
| | | नवीन उद्यान विकास | ५०००००० | १०८६१३० | २०००००० | ७०००००० | उपनगरात उद्याने विकसित करावयाचे असल्याने तरतुद वाढविणे आवश्यक. |
| | | मागासवर्गीय कल्याणकारी योजना | १००००००० | ३६३५९९३ | ८००००० | १८००००० | ५% प्रमाणे तरतुद करणे गरजेचे त्यामुळे वाढ |
| | | शहरात नवीन पाईप लाईन टाकणे | ३०००००० | २८७४९६४ | २०००००० | ५०००००० | तरतुद संपली आहे व प्रलंबित देयके अदा करणे असल्याने तरतुद वाढविणे आवश्यक |
| | | **एकुण रक्कम ( तरतुद)** | | | **३२९९००००** | | |

सही/-

मुख्य लेखाधिकारी

अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००८-२००९सालचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे तरतूदी नुसार तयार केलेले रू.३,२९,९०,०००/-फक्तचे पुनर्विनियोजीत अंदाज पत्रक मंजूरीस्तव.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-सन-२००८-२००९ सालचे पुनर्विनियोजीत अंदाजपत्रक मंजूरी साठी आहे. मा.सदस्यांनी सुचना दुरूस्त्या सांगाव्यात.

मुख्य लेखा अधिकारी श्री. कर्डीले पी.बी.:- अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २००८-२००९ चे मुळ अंदाज पत्रकातील खर्चाचे अनुदानात वाढ घट करणे बाबत विविध विभागा कडून आलेल्या प्रस्तावाची छाननी करून संबंधीत विभाग प्रमुखांची बैठक घेउन पुनर्विनियोजित अंदाजपत्रकीय रक्कमा कमी करणे किंवा त्या वाढविणे बाबतचे म.न.पा. अधिनियमा नुसार सन २००८-२००९ चे रूपये ३,२९,९०,०००/- चे पुनर्विनियोजित अंदाजपत्रक तयार करून मा.स्थायी समिती समोर मंजूरी साठी सदर केले आहे.अंदाजपत्रकातील जमा खर्चाचे अनुदान एका लेखाशिर्षातून घट करून दुस-या लेखाशिर्षात वाढ केल्याने एकुण मुळ अंदाज पत्रकात कोणतीही वाढ किंवा घट होत नाही.

शहरअभियंता श्री.पालवे व्ही.डी.:-सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते कॉक्रीटीकरणासाठीचे लेखाशिर्षावर प्रस्तावीत वाढीची रक्कम वीस लाख ठेवलेली आहे ती दहा लाखाने कमी करून शहरात नवीन पाईप लाईन या लेखाशिर्षावर वर दहा लाखाची तरतुद वाढविणेत यावी.

मा.सभापती साहेब :- आणखी काही वाढ घट करणे असल्यास सुचवावे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी.:- उद्यान विकासाची तरतुद कमी करून ड्रेनेज साठी तरतुद वाढवावी.

मुख्य लेखा अधिकारी श्री. कर्डीले पी.बी. :- पुनर्विनियोजित अंदाजपत्रकामध्ये सदरचे लेखाशिर्ष घेतलेले नसलेने त्याप्रमाणे वाढ करता येणार नाही.

अं.ले. प. श्री.गोरे पी.आर.:- आपले सुचने प्रमाणे बांधकाम विभागाने प्रस्ताव देणे आवश्यक आहे. बांधकाम विभागामार्फत तसा प्रस्ताव आल्यास पुढील वेळी वाढ करता येईल.

मा.सभापती साहेब :- अंदाजपत्रकाचे पुनर्विनियोजन किती वेळा करता येते.

मुख्य लेखा अधिकारी श्री. कर्डीले पी.बी. :- वेळोवेळी करता येते.

मा.श्री. शिंदे द.बा.:- पुनर्विनियोजित अंदाज पत्रकास मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- दुरूस्ती सह मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते कॉक्रीटीकरणासाठी प्रस्तावीत वाढीची रूपये २० लाखाची रक्कम रूपये दहा लाखाने कमी करून शहरात नवीन पाईप लाईन टाकणे या लेखा शिर्षावर रूपये दहा लाखाची तरतुद वाढविणेत यावी या प्रमाणे दुरूस्ती सह सन २००८-२००९ सालचे रूपये ३,२९,९०,०००/- चे पुनर्विनियोजित अंदाज पत्रकास, ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यात यावी.

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००८-२००९सालचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे तरतूदी नुसार तयार केलेले रू.३,२९,९०,०००/-फक्तचे पुनर्विनियोजीत अंदाज पत्रक मंजूरीस्तव.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००८-२००९ सालचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम १०३ व प्रकरण सात अनुसुची 'ड' मधील २(२) अ,ब,क चे तरतूदी नुसार तयार केलेले रूपये ३,२९,९०,०००/-फक्तचे पुनर्विनियोजीत अंदाज पत्रकावर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार बांधकाम विभागाकडील रस्ते कॉक्रीटीकरण या लेखा शिर्षावर प्रस्तावीत वाढीची दर्शविलेली रूपये वीस लाखाची तरतुद कमी करून रूपये दहा लाख ठेवणेस व शहरात नवीन पाईप लाईन टाकणे या लेखा वरील प्रस्तावीत वाढीची रक्कम रूपये वीस लाखा ऐवजी वाढ करून रूपये तीस लाख करणेस मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-८ मंगळवार दिनांक २९/७/२००८

ठराव क्रमांक :-८ मंगळवार दिनांक २९/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल २००७ ते मार्च २००८ अखेर चे महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक ५९(१) नमुना क्रमांक २७ प्रमाणे तयार केलेले बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे, नियम क्रमांक ६० नमुना क्रमांक २८ प्रमाणे मत्ता दायित्व व लेख्यांचा सारांश मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६( ३ ) अन्वये मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्ताव :- १ सादर,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये "नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा.स्थायी समितीस सादर केला पाहिजे" असे नमुद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र. ६० नमुना क्र. २८ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २००७ ते मार्च २००८ अखेर वार्षिक लेख्यांचा सारांश तयार करण्यात आला आहे. यात सुरवातीची शिल्लक रू. २७ कोटी ८६ लाख १३ हजार ४३० असून आर्थिक वर्षात रू. ९७ कोटी ४ लाख ४ हजार ७३९ इतके जमा झाले आहेत. सुरवातीची शिल्लक धरून एकुण जमा रू. १ अब्ज २४ कोटी ९० लाख १८ हजार १६९ असून रू. ९४ कोटी ५५ लाख ५९ हजार ११५ खर्च वजा जाता रू. ३० कोटी ३४लाख ५९ हजार ५४ इतकी अखेरची शिल्लक राहिली.

तसेच नियम नं. ६१ नमुना नं. २९ प्रमाणे ३१ मार्च २००८ अखेरचे मत्ता व दायित्व तयार करण्यात आलेले आहे. यात मत्ता हे रू. १ अब्ज २६ कोटी ३२ लाख ८९ हजार ५२८ असुन दायित्व २ अब्ज १५ कोटी ६५ लाख ९० हजार २१६ असुन दायित्व हे मत्तेपेक्षा ८९ कोटी ३३ लाख ०० हजार ६८८ ने अधिक आहे.

तरी मुख्य लेखापरिक्षकांचा अहवाल घेउन मा.स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

येणे प्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे

प्रस्ताव :- २ सादर,

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र. ५९ (१) नमुना क्र. २७ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २००७ ते मार्च २००८ अखेर बाबवार जमा-खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आलेले असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये "नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा.स्थायी समितीस सादर केला पाहिजे" असे नमुद करण्यात आले आहे.

तरी मुख्य लेखापरिक्षकांचा अहवाल घेउन मा.स्थायी समिती सभेपुढे मंजूरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.

येणे प्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल २००७ ते मार्च २००८ अखेर चे महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक ५९(१) नमुना क्रमांक २७ प्रमाणे तयार केलेले बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे, नियम क्रमांक ६० नमुना क्रमांक २८ प्रमाणे, वार्षिक लेख्यांचा सारांश नियम नं. ६१ नमुना नं.२९ प्रमाणे मत्ता दायित्व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६( ३ ) अन्वये मंजूरीस्तव.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मु.ले.अधिकारी श्री.कर्डीले पी.बी.:- म.न.पा. अधिनियमानुसार मुख्य लेखा परिक्षकाने म.न.पा च्या मागिल सरकारी वर्षातील संपुर्ण लेख्या वरील आपला अहवाल मा.स्थायी समिती समोर सादर केला पाहिजे त्यानुसार सन २००७-२००८ चे वार्षिक लेख्यांचा सारांश तयार केलेला असुन मत्ता दायित्वाचे तक्ते तयार करून मंजूरीस्तव सादर केलेले आहेत. मागिल वर्षी वसुली विभागाचे वसुलीचे अर्थ संकल्पीय अंदाजा पेक्षा प्रत्यक्षात वसुली कमी झालेली आहे. त्याच प्रमाणे निश्चित केलेले अर्थ संकल्पीय अंदाजाप्रमाणे निरनिराळया लेखा शिर्षावरील आकडेवारी पहाता जमा वसुली कमी झालेली आहे. तसेच मागिल वर्षी नवीन पोल टाकणे, शव वाहिणी खरेदी, फिरता दवाखाना,वृक्षारोपण, खेळणी खरेदी, इमारत दुरूस्ती इत्यादी लेखाशिर्षावरील तरतुदीनुसार खर्च न झाल्याने तशाच राहिलेल्या आहेत. लेखा संहिता १९७१ मधील परिशिष्ट एक नियम २ अ (१) पान क्र. ३ व पान क्र. ९८ वरील तरतूदीनुसार अर्थ संकल्पीय तरतुदी ३१ मार्च पर्यत खर्च न झाल्यास अनुदानातील शिल्लक व्यपगत होत असल्याने या लेखा शिर्षावरील रकमा खर्च न झाल्याने त्या व्यपगत झालेल्या आहेत. यापुढे दिलेल्या वसुलीच्या उद्दीष्टाप्रमाणे वसुली झाली किंवा नाही हे पहाणे महत्वाचे आहे.आपले मनपाचा खर्च वाढता आहे.त्याप्रमाणात उत्पन्न ही वाढले पाहिजे तसेच खर्चाच्या मर्यादे पर्यत खर्च करणे ही आवश्यक आहे.मार्च नंतर मागिल वर्षीच्या खर्चाच्या तरतुदी व्यपगत होतात.त्यासाठी उद्दीष्टा प्रमाणे खर्च ही होणे आवश्यक आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- मा.आयुक्त साहेबांनी खाते प्रमुखांची मिटींग घेउन वसुली वाढविणे, तसेच खर्च होणे साठी खाते प्रमुखांना सुचना देण्यात याव्यात.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- दरमहा आढावा बैठक घेउन खाते प्रमुखांना सुचना द्याव्यात वर्षाचे शेवटी शेवटी वेळ मिळत नाही.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- सध्याची परिस्थीती कशी आहे.

मु.ले.अधिकारी. श्री. कर्डीले पी.बी. :- चांगली आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल २००७ ते मार्च २००८ अखेर चे महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक ५९(१) नमुना क्रमांक २७ प्रमाणे तयार केलेले बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे, नियम क्रमांक ६० नमुना क्रमांक २८ प्रमाणे, वार्षिक लेख्यांचा सारांश नियम नं. ६१ नमुना नं.२९ प्रमाणे मत्ता दायित्व मंजूर करणेत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-९ मंगळवार दिनांक २९/७/२००८

ठराव क्रमांक :-९ मंगळवार दिनांक २९/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये म्यु.पल घर नं. ४०२७ या घराचे धोकादायक भागा बाबत केलेल्या कारवाई च्या अनुषंगाने भाडेकरी श्री. सु.ना. पारगांवकर यांचे ताब्यातील घरातील जप्त केलेल्या सामानाचे नुकसान भरपाई बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** टिप्पणी-सादर,विषय- महाजन गल्ली येथील म्यु. घर नं. ४०२७ या धोकादायक घरावर तत्कालीन नगरपालिकेने केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने भाडेकरी श्री. सु.ना. पारगांवकर यांच्या ताब्यात असलेल्या जागेच्या व जप्त केलेल्या सामानाचे नुकसान भरपाई मिळणेबाबतचा अर्ज.

संदर्भ :- १] मा.जिल्हाधिकारी यांचे कडील दि. २८/२/०७ चे पत्र.
२] दि. १८/१/०८ रोजी मा.आयुक्त साहेब यांचे दालनात झालेल्या समक्ष सुनावणी.
३] दि. १६/६/०८ रोजी मा.आयुक्त साहेब यांचे दालनात झालेली बैठक.

उपरोक्त विषयान्वये महाजन गल्ली येथील म्यु.घर नं. ४०२७ या घराचा धोकादायक भागाबाबत घर मालक कै. गो.म.बडवे यांनी अर्ज दिल्यावरून तत्कालीन नगरपालिकेचे सिव्हील इंजिनिअर यांनी समक्ष घराची पहाणी करून घर मालक व भाडेकरी यांना नोटीस काढणे बाबत अहवाल सादर केला. सदरचा अहवाल सादर केल्यावर घर मालक व भाडेकरी यांना नगरपालिका अधिनियम १९६५ मधील कलम १९५ अन्वये नोटीस काढून नोटीस घरमालक यांना बजावण्यात आली परंतु भाडेकरी श्री.सु.ना. पारगांवकर हे महाजनगल्ली येथे रहात नसल्याने नगरपालिका शिपाई नवलेनगर येथे नोटीस भाडेकरी श्री.सु.ना.पारगांवकर यांना बजावण्यास गेला असता शिपायाच्या रिपोर्टावरून त्यांचे घर सापडले नाही. त्यामुळे भाडेकरी श्री. सु.ना. पारगांवकर यांना नोटीस बजावता आली नाही. सदरची नोटीस कायदयातील तरतूदीनुसार भाडेकरी श्री.सु.ना.पारगांवकर यांचे घराचे दारावर पंचासमक्ष डकवून पंचनामा केला.

नोटीसला अनुसरून घर मालक यांनी घराचा धोकादायक भाग नगरपरिषदेने पाडून टाकावा त्या कामी जो खर्च येईल. तो मी भरण्यास तयार आहे. असे कळविल्यावरून सदर घराचा धोकादायक भाग नगरपालिकेमार्फत उतरून घेंणे कामी घरमालक यांचे कडून पैसे भरून घेणे कामी व सदर घराचा धोकादायक भाग पोलीस मदत घेवून काढून टाकण्याबाबत मंजूरी करीता मा.मुख्याधिकारी यांचेकडे रिपोर्ट ठेवल्यानंतर मा.मुख्यधिकारी यांनी त्यास मान्यता दिल्यावर घरमालक यांना पैसे भरण्याबाबत पत्र देवून त्यांचेकडून रूपये ३०००/- भरून घेतल्यानंतर म्यु.घर नं. ४०२७ या घराचा धोकादायक भाग उतरून घेणे कामी पोलीस निरिक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन यांना पत्र दिले तद्नंतर दि. १४/९/०२ रोजी घराचा धोकादायक भाग पाडण्यापूर्वी घरातील संसारउपयोगी परंतु निरूपयोगी सामानाचा पंचनामा करून पंचा समक्ष साहित्य ताब्यात घेतले व घराचा धोकादायक भाग उतरून घेतल्यानंतर सामान यादी प्रमाणे म्युनिसिपल घाणीवर स्टोअरला डयुटीवर कार्यरत असलेले श्री. कुलांगे यांच्या कडे जमा करून स्टोअर रजिस्टरला नोंद केली आहे. त्यानंतर भाडेकरी श्री.सु.ना.पारगांवकर यांनी लोकशाही दिनात अनेक वेळा अर्ज करून व तसेच माहितीच्या अधिकारात अनेक वेळा पत्रव्यवहार केला त्याप्रमाणे त्यांना कागदपत्रे व त्यांचे प्रश्नाची वेळोवेळी उत्तरे देण्यात आलेली आहे. त्यावर त्याचे समाधान न झाल्याने तत्कालीन लिगल रिटेनर ॲड. श्री. प्रकाश कोठारी यांचा अभिप्राय घेवून मा.आयुक्त श्री. सानप यांनी जा.क्र. सा.बा. २६७ दि. २५/७/०३ रोजी पत्र देवून खुलासा केला त्यामुळे नुकसान

भरपाई देण्याचा प्रश्नच उध्दभक्त नाही असे कळविले त्यावर श्री.सु.ना.पारगांवकर यांचे समाधान झाले नाही त्यामुळे पुन्हा मा.आयुक्त श्री. मेतके यांनी स्वतः श्री.सु.ना. पारगांवकर व संबंधीत इंजिनिअर श्री.बडवे बी.एम. यांची सुनावणी घेवून तसे जा.क्र. /साप्रवि/ ४३८५ दि. २९/३/०५ रोजी पत्र देवून पंचनाम्यात जमा केलेले साहित्य मालकी हक्का बाबत सबळ पुरावा देवून खात्री पटवून संबंधीत अभियंता यांचे कडून साहित्य घेवून जाण्याचे करावे असे भाडेकरी श्री.सु.ना.पारगांवकर यांनी जमा केलेले सामान नेले नाही त्या नंतरही त्यांनी लोकशाही दिनात तक्रारी देण्याचे चालू ठेवले तसेच त्याच्या विरूध्द मुळ घर मालक व भाडेकरी यांच्यातील कोर्टातील दावे १] रे.मु.नं.५२१/९३ २] रे.मु.नं.३५२/९५ ३] रे.मु.नं. २५/२००० विरूध्द गेलेले आहेत. दि. २८/२/०७ रोजी मा.जिल्हाधिकारी यांनी संबंधीत प्रकरणाबाबत दोषी अधिकारी यांचेवर कारवाई करणेबाबत कळविल्यावरून संबंधीत इंजिनिअर श्री.बडवे बी.एम. यांना कारणे दाखवा नोटीस मा.उपायुक्त यांनी बजावली सदर नोटीसला श्री. बडवे बी.एम. उपशहर अभियंता यांनी कारणे दाखवा नोटीसला उत्तर देवून माझी चौकशी करता येणार नाही व ते दि. १/४/०७ पासून सेवा निवृत्त असल्याने त्यांचे चौकशी बाबत श्री. बडवे बी.एम. यांनी अलीकडचा पाटणा उच्च न्यायलयाचा निकालची छायांकित प्रत सादर केली तय नंतर मा.उपायुक्त साहेब यांनी फेर आदेश देवून श्री.एन.बी. मगर यंनी चौकशी करून व सेवा निवृत्त श्री.बडवे बी.एम.यांना नोटीसने संधी देवून अहवाल सादर करण्यास सांगितले त्यावर त्यांनी अहवाल सादर केला असता सदर अहवालावर मा.उपायुक्त यांनी भाडेकरी श्री.सु.ना.पारगांवकर यांना समक्ष दि. ७/११/०७ रोजी सकाळी ११.३० वाजता कार्यालयात बोलावून सुनावणी घेतली त्यामध्ये श्री.सु.ना. पारगांवकर यांनी स्वतःचे म्हणने लेखी देवून त्यावर स्वाक्षरी केली व खालील प्रमाणे आपले म्हणने दिले आहे.

माझ्या ताब्यातील पाडलेले चार खण बांधून द्यावेत पूर्वेकडील बैठकीच्या खोलीचा काढलेला दरवाजा बसवून द्यावा व नगरपालिकेने जप्त केलेले सामान परत द्यावे सामानाची नुकसानी झाले बद्दल रूपये १५,०००/- भरपाई द्यावी.

तत्कालीन नगरपरिषदेने व म.न.पा. ने कायद्या अन्वये नोटीस काढून धोकादायक भागावर कारवाई करण्यात आलेली आहे. तत्पूर्वी मुळ घराचे घर मालक कै. गो.म.बडवे यांना वरीलप्रमाणे कायद्यानुसार नोटीस दिल्यानंतर त्यांनी घराचा रितसर धोकादायक भाग उतरून घेणे करीता पैसे भरल्यानंतर धोकादायक भाग उतरू न घेतला आहे. परंतु भाडेकरी श्री.सु.ना. पारगांवकर यांनी वेळोवेळी लोकशाही दिनांत तक्रारी केल्यानंतर तत्कालीन आयुक्त श्री. सानप व श्री. मेतके यांनी निर्णय देवून तक्रारी निकाली काढल्या होत्या तसे त्यांना कळविण्यात आले होते. परंतु श्री.सु.ना.पारगांवकर यांनी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे लोकशाही दिनांत नुकसान भरपाईची मागणी केली होती. त्यावर मा.जिल्हाधिकारी सहेब यांनी दि. २८/२/०७ रोजी दिलेल्या भरपाईची मागणी केली होती. त्यावर मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी दि. २८/२/०७ रोजी दिलेल्या पत्रावरून श्री. एन.बी. मगर यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्या बाबत त्यांनी चौकशी अहवाल सादर केला असून त्या अहवालात त्यांनी श्री. बडवे बी.एम. यांनी कुठल्याही प्रकारे नुकसान केलेले व भाडेकरी श्री. सु.ना. पारगांवकर यांचे जप्त केलेले सामान त्यांना घेवून जाण्याबाबत तसे त्यांना कळविण्यात आले होते. मात्र त्यांनी त्यांच्या सामानाबाबत केलेला उल्लेख भरपाई बाबत रू. १५,०००/- ची मागणी केली आहे. त्यावर श्री. सु.ना. पारगांवकर यांनी वारंवार लोकशाही दिनात तक्रार अर्ज करून एकुण ६१ अर्ज दिलेले आहे. तसेच मा. लोक आयुक्त यांचेकडे तक्रारी करून नुकसान भरपाई मिळण्याबाबत अर्ज केले त्यावरून मा.आयुक्त यांनी समक्ष दि. १८/१/०८ रोजी सुनावणी घेवून व भाडेकरी श्री.सु.ना. पारगांवकर यांचे दि. २९/४/०४ चे पत्रावरून

पाडलेल्या बांधकामाचे रू. ७५,०००/- व चोरीस गेलेल्या सामानाचे रू. १५,०००/- असे एकुण रू. ९०,०००/- नुकसान भरपाई तत्कालीन सिव्हील इंजिनिअर श्री.बडवे बी.एम. यांचे वर निश्चित केलेली आहे. परंतु तत्कालीन सिव्हील इंजिनिअर श्री. बडवे बी.एम. हे सेवानिवृत्त झालेले असुन त्यांना अद्यापपर्यत सेवा निवृत्तीचे फायदे देण्यात आलेले नाहीत. तसेच त्यांचे वया बाबत मा.शासनाकडे वाद प्रलंबित आहे श्री.बडवे बी.एम. यांना नुकसानी बाबत रू. १५,०००/-भरणे विषयी जा.क्र. साप्रवि/३३३३ दि.४/१/०८ अन्वये कळविले असता त्यांनी सदरचे नुकसान भरपाईचे वसुली बाबत मा.औद्योगिक न्यायालयातून स्थगिती आदेश मिळवला आहे.

तरी दि. १६/६/०८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदरील प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे सादर करणे बाबत सुचविण्यात आलेले आहे.

माहितीस्तव सादर.

येणे प्रमाणे उपशहर अभियंता यांचा अहवाल असे दि.१६/६/०८

शहर अभियंता :- मा.स्थायी समितीकडे सादर करणेस्तव दि. १९/६/०८

मा.उपायुक्त साहेब :- "कॅफो" प्रस्तावीत मा.स्थायी समिती पाठविणेसाठी सादर करावे.दि. १९/६/०८

मुख्य लेखाधिकरी :- मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर दि. २०/६/०८

मा.उपायुक्त साहेब :- "अ" प्रस्तावीत मा.स्थायी समिती कडे निर्णयार्थ पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.
दि. २०/६/०८

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मा.सहा. आयुक्त श्री. देशमुख साहेब :- महाजन गल्ली येथील म्यु.पल घर नं. ४०२७ या घराचे धोकादायक भागाबाबत घरमालक यांनी अर्ज दिल्या वरून तत्कालीन नगरपालिकेचे सिव्हील इंजिनिअर यांनी समक्ष पहाणी करून घरमालक व भाडेकरी यांना नोटीस काढणे बाबत अहवाल सादर केल्यावर घरमालक भाडेकरी यांना नोटीस काढणेत आली ती घरमालक यांना बजावण्यांत आली,भाडेकरी श्री.सु.ना.पारगांवकर हे महाजन गल्ली येथे रहात नसल्याने नवले नगर येथे शिपाई नोटीस बजावण्यांस गेले असता भाडेकरी श्री.सु.ना.पारगांवकर यांचे घर सापडले नाही असे शिपायाच्या रिपोर्टावरून आढळते त्यामुळे भाडेकरी यांचे घराचे दारावर सदर नोटीस पंचनामा करून डकविण्यात आली. तसेच भाडेकरी यांचे घरातील सामानाचा पंचनामा करून पंचा समक्ष सामान ताब्यात घेउन स्टोअरला ( घाणीवर) जमा केले तशी स्टोअर ( घाणी) रजिस्टरला नोंद आहे. परंतु घाणी वर जमा केलेले सामान आजमीतीस उपलब्ध नाही.

मा.सभापती साहेब :- सामान घाणीवर जमा केले परंतु ते चोरीला गेलेले आहे.

मा.सहा. आयुक्त श्री. देशमुख साहेब :- श्री. पारगांवकर यांनी लोकशाही दिनात अनेक वेळा तक्रार अर्ज दिलेले आहेत. भाडेकरी हे जप्त केलेल्या सामानाची नुकसान भरपाई म्हणून रूपये १५,०००/- व पाडलेल्या बांधकामचे रूपये ७५,०००/- असे एकूण रू. ९०,०००/- व सामानाचे रक्कमेची मागणी करीत आहेत. तत्कालीन सिव्हील इंजिनिअर यांचे वर नुकसान भरपाई रू. ९०,०००/- निश्चित केलेली आहे. परंतु तत्कालीन सिव्हील इंजिनिअर श्री. बडवे बी.एम. हे सेवानिवृत्त असून त्यांना अद्यापपर्यंत सेवानिवृत्तीचे फायदे देण्यात आलेले नाहीत. त्यांचे वयाबाबत मा. शासनाकडेस बाब प्रलंबित आहे. श्री.बडवे बी.एम. यांना नुकसान भरपाई बाबत रू. १५,०००/- भरणे विषयी कळविले असता त्यांनी सदरचे नुकसान भरपाईचे वसुली बाबत मा.औद्योगिक न्यायालयातुन स्थगिती आदेश मिळविला आहे. मा.स्थायी समितीने श्री. बडवे बी.एम. यांचे कडून नुकसान भरपाई वसुली बाबत निर्णय घेतल्यास मा. शासनाकडेस मंजूरीसाठी पाठविणेत येईल मा.शासनाचे निर्णयानुसार सदर बाबत पुढील कार्यवाही करणेत येईल.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- सदर प्रकरणी म.न.पा.चे कायदेशीर सल्लागार यांचे मत घेतलेले आहे का?

मा.सहा.आयुक्त श्री. देशमुख साहेब :- घेतलेले आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- सदर प्रकरणी पुन्हा म.न.पा.चे कायदे विषयक सल्लागार यांचे मत घेण्यांत यावे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- या प्रकरणी म.न.पा.चे कायदे विषयक सल्लागार यांचे मत घेउन सभे पुढे सादर करावे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- कायदेशीर मत घेउन निर्णयासाठी सभे पुढे निर्णयासाठी ठेवण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- सदरचे संपुर्ण प्रकरण म.न.पाचे कायदे विषयक सल्लागार यांचे कडेस पाठविण्यात यावे त्यांचे कायदेशीर मतासह प्रस्ताव स्थायी समिती पुढे निर्णयासाठी ठेवण्यात यावा.

**ठराव :-** नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये म्यु.पल घर नं. ४०२७ या घराचे धोकादायक भागा बाबत केलेल्या कारवाई च्या अनुषंगाने भाडेकरी श्री. सु.ना. पारगांवकर यांचे ताब्यातील घरातील जप्त केलेल्या सामानाचे नुकसान भरपाई बाबत चे कार्यालयीन प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

घर नं. ४०२७ या घराचे धोकादायक भागाबाबत केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने भाडेकरी श्री. सु.ना. पारगांवकर यांचे ताब्यातील घराचे सामानाचे नुकसान भरपाई बाबत चे संपुर्ण प्रकरण महानगरपालिकेचे कायदे विषयक सल्लागार यांचेकडेस पाठवून सदर प्रकरणी त्यांचे कायदेशीर मतासह प्रस्ताव स्थायी समिती सभे पुढे निर्णयासाठी सादर करणेत यावा.

सुचक :- मा. श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-८**
सन २००८-२००९

विषय क्रमांक :-१० मंगळवार दिनांक २९/७/२००८
ठराव क्रमांक :-१० मंगळवार दिनांक २९/७/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ५ दिनांक १८/०९/२००६ अन्वये चे मंजूरी नुसार "प्रभाग क्रमांक १० संजयनगर झोपडपट्टी भागासाठी ८० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन म.न.पा. अग्निशमन दल कर्यालय ते संजयनगर दरम्यान टाकणे" ऐवजी सदर पाईप लाईन " आगरकर मळा येथील पाण्याचे उंच टाकी पासून संजय नगर दरम्यान टाकणे" असा बदल करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- संजयनगर येथे ८० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे कामी जागेत फेरबदल करणे बाबत.

टिप्पणी- मा.स्थायी समिती ठराव क्र. ५ दिनांक १८/९/२००६ अन्वये अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १० संजयनगर झोपडपट्टी भागासाठी प्रस्तावीत रक्कम रूपये ९,१८,७२७/- खर्चाची ८० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन मंजूर झाली असून त्यानुसार सदरची पाईपलाईन महानगरपालिका अग्निशमन दल कार्यालय ते संजयनगर दरम्यान टाकण्यास मंजूरी मिळाली आहे.

परंतु अग्निशमन दल कार्यालय पासून संजयनगर झोपडपट्टी येथील भाग उंचावर असल्याने संजयनगर येथे पाणी पुरेशा दाबाने मिळण्यास तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे सदर पाईप लाईन टाकताना वाडीया पार्क समोरील रस्त्याच्या कडेने खोदकाम करावे लागणार असुन यामुळे रस्ता वाहतुकीलाही अडथळा निर्माण होउ शकतो.

त्यासाठी संजय नगर झोपडपट्टी पासून जवळच असलेल्या आगरकर मळा येथे नव्याने पाण्याची उंच टाकीचे काम पूर्ण झाले असून वाटपही चालू झाले आहे. व सदरची टाकीही संजयनगर भागासाठी उंचीवरील भागात असल्याने नवीन जलवाहिनी अग्निशमन दल कार्यालयापासून टाकण्याऐवजी आगरकर मळा येथील उंच टाकीमधून पुरेशा दाबाने पाणी मिळेल व या कामामुळे पाईप लाईन टाकणेच्या ठिकाण बदलल्यामुळे प्रस्तावीत खर्चातही जास्त फरक पडणार नाही. अशा अशयाच्या सादर प्रस्तावामध्ये मा.उपायुक्त साहेब यांनी प्रस्तावीत कामी जागेत फेरबदल करणेस हरकत नाही. मात्र मंजूर अंदाजपत्रकीय खर्चामध्येच काम करणे बंधन कारक राहिल. वाढीव खर्च मान्य असणार नाही. या अटीवर मान्य करणेस हरकत नाही.

तसेच मा. आयुक्त साहेब यांनी मा.स्थायी समिती ठराव क्र. ५ दिनांक १८/९/२००६ मध्ये तसा बदल करण्यास मा.स्थायी समितीची मंजूरी घ्यावी असे निर्देशित केलेले आहे. अशाबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचा अहवाल असे दि.२१/७/०८
शहर अभियंता :- मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस्तव सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ५ दिनांक १८/०९/२००६ अन्वये चे मंजूरी नुसार "प्रभाग क्रमांक १० संजयनगर झोपडपट्टी भागासाठी ८० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन म.न.पा. अग्निशमन दल कर्याल्य ते संजयनगर दरम्यान टाकणे" ऐवजी सदर पाईप लाईन " आगरकर मळा येथील पाण्याचे उंच टाकी पासून संजयनगर दरम्यान टाकणे" असा बदल करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक १० मधील संजय नगर झोपडपट्टी भागासाठी करावयाच्या पाईप लाईनचे जागेत बदल करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- किती रक्कमेचा प्रस्ताव आहे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी.:- सदर कामाचा अंदाज पत्रकीय खर्च रूपये नउ लाख आठरा हजार सातशे सत्तावीस फक्त असुन सदरचे टाकावयाच्या पाईप लाईनचे ठिकाणात बदल करणेस मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सादर केलेला आहे त्यामुळे सदर कामाचे खर्चात कुठल्याही प्रकारची वाढ होत नाही.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ५ दिनांक १८/०९/२००६ अन्वये चे मंजूरी नुसार " प्रभाग क्रमांक १० संजय नगर झोपडपट्टी भागासाठी ८० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन म.न.पा. अग्निशमनदल कर्यालय ते संजयनगर दरम्यान टाकणे" ऐवजी सदर पाईप लाईन " आगरकर मळा येथील पाण्याचे उंच टाकी पासून संजय नगर दरम्यान टाकणे" असा बदल करणेस मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत करावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.श्री.शिंदे दशरथ बाबु

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.